# नियमित दिवाणी कज्ञा नं. १२३/२०१८ मधील निशाणी क्र. ०५ खालील आदेश

आनंदराव उर्फ आनंदा राणोजी घोरपडे वि. बाबू दादू घोरपडे.

**CNR -MHKO130003012018**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम १ व २ अन्वये, वादी यांना दावा मिळकत गाडी रस्त्याच्या वापरास व वहिवाटीस प्रतिवादींनी अगर त्यांच्या इसमांनी कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये व दावा मिळकत गाडी रस्ता प्रतिवादी व त्यांच्यातर्फे इसमांनी बंद करु नये असा तुर्तातूर्त मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे.

## वादीची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः–

खालील मिळकतींचा उल्लेख यापुढे 'दावा मिळकत' असा करण्यात येइलः–

| अ.क्र. | गाव व गट क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १. | बोरवडे, ता. कागल, जि. कोल्हापूर, येथील गट क्र. ७५८ मधीलः– | क्षेत्र ०हे. ७४आर<br>मधील गट क्र. ७५८ च्या जमिनीच्या दक्षिणेकडील गट क्र. ७५९ च्या हद्दीस लागून असणारे दक्षिणोत्तर १० फूट रुंद व पूर्व–पश्चिम ४१० फूट इतक्या लांबीचा गट क्र. ७५८ मधील संपूर्ण वहिवाटीचा गाडी रस्ता, त्यापैकी पश्चिमेकडील बिद्री–मुदाळतिठ्ठा सरकारी रस्त्यास लागून असणारा दक्षिणोत्तर १० फूट रुंदीचा व पूर्व–पश्चिम ७५ फूट इतक्या लांबीच्या वहिवाटीचा गाडी रस्ता. |

या मिळकतीस यापुढे ‘दावा मिळकत’ म्हणून संबोधण्यात येते.

**०२.** वादीच्या पुढील कथनानुसार, वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ हे

एकमेकांचे चुलत बंधू आहेत. प्रतिवादी क्र. ५ यांचा वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या घराण्याशी कोणताही रक्त संबंध नाही. प्रतिवादी क्र. ५ यांचे घराणे हे त्रयस्थ आहे. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ तसेच दिनकर दत्तात्रय घोरपडे व महादेव दत्तात्रय घोरपडे यांची वडीलार्जित व सामाईक मालकी वहिवाटीची शेत मिळकत आहे. वादी व प्रतिवादी तसेच महादेव घोरपडे व दिनकर घोरपडे यांच्यामध्ये दावा मिळकती पैकी गट क्र. ७५८ व अन्य वडीलार्जित मिळकतींच्या वाटपाकरीता नोंद वाटणीपत्र दस्त क्र. मगड/१०१३/२०१३ हे दि. १३/०६/२०१३ रोजी झालेले आहे व त्या वाटणीपत्रान्वये फेरफार क्र. ५६०६ ने दि. ०१/०९/२०१३ रोजी वाटणीपत्राचा अंमल मिळकतींच्या ७/१२ पत्रकी देण्यात आला आहे. सबब, गट क्र. ७५८ व अन्य मिळकती यांच्याकरीता वादी व प्रतिवादी यांची स्वतंत्र कब्जेवहिवाट झाली आहे व त्यानुसार वादी यांच्या हिश्श्यास क्षेत्र ०–४९.०१ आर हे पूर्व दिशेस स्वतंत्रपणे कब्जेवहीवाटीस आले आहे. वादी हे त्यांच्या क्षेत्रातील गाडी रस्त्याचे क्षेत्र वजा जाता राहिलेल्या क्षेत्रामध्ये ऊस, सोयाबीन इत्यादी पिके घेत आहेत.

**०३.** वादीच्या पुढील कथनानुसार, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना वरील वाटणीपत्राप्रमाणे पश्चिमेकडील बिद्री ते मुदाळतिट्टा सरकारी रस्त्यास लागून असलेल्या हिश्श्याचे क्षेत्र वाटून आलेले आहे. वरील वाटणीपत्र होताना गट क्र. ७५८ मधील सहहिस्सेदार म्हणजेच वादी यांनी पूर्वेच्या हिस्यामध्ये जाणे–येणेकरीता तसेच शेतजमिनींमधील पिकांची ने–आण करणेकरीता दक्षिणेकडील गट क्र. ७५९ चे हद्दीस लागून असलेल्या पूर्व–पश्चिम १० फूट रुंद व ४१० फूट इतक्या लांबीचा वहिवाटीचा गाडी रस्ता हा सर्वांच्या वापरासाठी खुला ठेवण्याचा आहे असे ठरले होते. सबब, सदर गाडी रस्त्याचा वापर करण्याचा अधिकार वादी यांना होता व आहे. वरील गाडी रस्ता हा सर्व हिस्सेदारांनी ५०

वर्षे व त्यापेक्षाही अधिक काळापासून सोडलेला आहे. सदर गाडी रस्त्याचा वापर वादी व प्रतिवादी तसेच सदाशिव घोरपडे, दिनकर घोरपडे, महादेव घोरपडे हे इसम गेली ५० वर्षांपासून करत आलेले आहेत. गाडी रस्त्याचे क्षेत्र वजा जाता उरलेल्या क्षेत्रामध्ये वादी व प्रतिवादी तसेच सदाशिव घोरपडे, दिनकर घोरपडे, महादेव घोरपडे हे सोयाबीन, मिरची, ऊस इत्यादी पिके घेत आहेत. वादी यांना वरील गाडी रस्ता वगळता वहिवाटीकरीता अन्य पर्यायी रस्ता नाही. वादी हे वरील रस्त्याचा वापर अत्यावश्यक गरज म्हणून वहिवाटीच्या हक्काने करत आलेले आहेत.

**०४.** वादीच्या पुढील कथनानुसार, वादी वरीलप्रमाणे गाडी रस्त्याचा वापर करीत असताना, प्रतिवादी यांनी दि. २५/०५/२०१८ रोजी वादी यांना गाडी रस्त्याच्या वापरास हरकत अडथळा केला व सदर रस्त्याचा वापर करु देणार नाही असे कथन केले. सदर गाडी रस्त्याची नोंद ही ७/१२ पत्रकी झालेली नाही. सबब, प्रतिवादी यांच्या वरील कृत्यास अनुसरुन दाद मागण्याकरीता वादीनी त्यांचे विधिज्ञ श्री. एस.टी.चव्हाण यांचेमार्फत दि. ०२/०७/२०१८ रोजी प्रतिवादींना नोटीस पाठवली. तथापि, सदर नोटीसीस आजतागायत कोणतेही उत्तर प्रतिवादींनी दिलेले नाही. सबब, प्रतिवादींविरुध्द दाद मागण्याकरीता, सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**<u>प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः</u>–**

**०५.** सदर अर्जास प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी निशाणी क्र. २३ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांनी वादी कथन करतात त्याप्रमाणे गाडी रस्ता अस्तित्वात असल्याचे कथन पूर्णतः नाकारलेले आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार, गट क्र. ७५८ व अन्य मिळकतींचे वादी कथन

करतात त्याप्रमाणे दि. १३/०६/२०१३ रोजी वाटप झालेले आहे व त्याप्रमाणे नोंदणीकृत वाटणीपत्र झाले असून त्यानुसार नोंदी देखील हिस्याप्रमाणे ७/१२ पत्रकी झालेल्या आहेत. मात्र, सदर वाटणीपत्राचे अवलोकन करता, त्या वाटणीपत्रामध्ये वादी नमुद करतात त्याप्रमाणे जागेवर कोणताही रस्ता नव्हता अगर नाही ही बाब दिसून येते. दावा मिळकतीमध्ये रस्ता असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा नाही तसेच त्याबाबत कोणताही नकाशा देखील उपलब्ध नाही. वादी हे कोर्टाची दिशाभूल करुन नसलेला रस्ता दाखविण्याचा प्रयत्न करत आहेत. यदाकदाचित सदर रस्ता अस्तीत्वात असता तर त्याची नोंद वादी व प्रतिवादी यांनी वाटणीपत्रात केली असती. तथापि, तशी कोणतीही नोंद वादी व प्रतिवादी यांनी वाटणीपत्रामध्ये केलेली नाही. त्यामुळे, वरील सर्व कारणास्तव सदरचा अर्ज चालण्यास पात्र नसल्याने, तो नामंजूर करावा असे प्रतिवादींचे कथन आहे.

## <u>प्रतिवादी क्र. ५ ची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः</u>–

**०६.** प्रतिवादी क्र. ५ यांनी निशाणी क्र. १८ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले आहे व अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादींनी वादी कथन करतात त्याप्रमाणे गाडी रस्त्याचा मजकूर संपूर्णतः नाकारलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादीच्या कथनानुसार, गट क्र. ७५८ मधील महादेव घोरपडे यांचा पूर्ण हिस्सा व दिनकर घोरपडे यांच्या मालकी हिश्श्यापैकी १ आर असे एकूण ०.०८.४ आर इतकी जमिन नोंदणीकृत दस्त क्र. ३२/२०१५ अन्वये दि. ०६/०१/२०१५ रोजी प्रस्तुत प्रतिवादींनी खरेदी घेतली आहे व त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ५ यांच्या नावाची नोंद ७/१२ पत्रकी झाली आहे. वादीनी ब–याच बाबी न्यायायालयापासून लपवून ठेवल्या आहेत. वादी कथन करतात त्याप्रमाणे, कोणताही रस्ता गट क्र. ७५८ मध्ये अस्तीत्वात नव्हता, तशी त्या रस्त्याची कोणतीही नोंद महसूल अभिलेखा

सदरी नाही. सबब, वादींनी वरीलप्रमाणे आभासी रस्ता याप्रकरणी निर्माण करुन दाव्याची रचना केली आहे. त्यामुळे वरील सर्व कारणांचा विचार करुन, प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

**०७.** वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस.टी. चव्हाण व प्रतिवादी क्र. १ ते ४ तर्फे विधिज्ञ श्री. एस.एम. सावर्डेकर यांचा युक्तीवाद ऐकला.

**०८.** प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालील प्रश्न बिंदू (Points) उपस्थित झाले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसे सहित मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.–

| अ.क्र. | प्रश्न बिंदू (Points) | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | वादीस प्रथमदर्शनी केस आहे का ? | नकारार्थी. |
| **२.** | सोईचा समतोल वादीच्या बाजूने आहे का ? | नकारार्थी. |
| **३.** | अर्ज नामंजूर केल्यास अपरिमित हानी वादींना होईल का ? | नकारार्थी. |
| **४.** | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**– का र ण मिं मा सा –**

**प्रश्न बिंदू क्र. १ ते ३ –**

**०९.** वरील सर्व प्रश्न बिंदू हे एकमेकांशी निगडीत असल्याने अर्जातील वस्तुस्थितीची पुनरावृत्ती टाळण्याकरीता, वरील तिन्ही प्रश्न बिंदूची एकत्रितरित्या चर्चा करण्यात येत आहे.

**१०.** वादी कथन करतात त्याप्रमाणे, वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यामध्ये गट क्र. ७५८ व अन्य मिळकतींबाबत नोंदणीकृत वाटणीपत्र झाले असल्याबाबत उभय पक्षकारांमध्ये कोणतेही दूमत नाही असे दिसते. किंबहुना

सदरची बाब प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यामध्ये स्पष्टपणे मान्य केली आहे असे दिसून येते. गट क्र. ७५८ मध्ये वादी कथन करतात त्याप्रमाणे गाडी रस्ता असल्याचे वादीचे ठाम कथन आहे तर सदरील बाब प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारलेली आहे. वादीच्या कथनानुसार, वाटणी वेळेस वरील गाडी रस्ता वहिवाटीकरीता ठेवण्याचे ठरले आहे व सदर रस्ता गेली ५० वर्षे वादी व प्रतिवादी वापरत आहेत असे वादीचे कथन आहे. प्रतिवादींनी वरील बाब देखील पूर्णपणे नाकारलेली आहे.

**११.** वरील परस्पर विरोधी कथनांच्या अनुषंगाने उभयंतामधील झालेल्या नोंदणीकृत वाटणीपत्राचे अवलोकन करता, सदर वाटणीपत्रामध्ये वरीलप्रमाणे गाडी रस्त्याचा कोठेही उल्लेख करण्यात आला आहे असे दिसून येत नाही. किंबहुना, सदर गाडी रस्ता अस्तीत्वात आहे याबाबतीत कोणतीही नोंद महसूल अभिलेख सदरी असल्याचे दिसून येत नाही. वादींनी त्यांच्या कथनापुष्ठर्थ कच्चा हात नकाशा दाखल केला आहे तर प्रतिवादींनी देखील त्यांच्या कथनापुष्ठर्थ त्यांचा कच्चा हातनकाशा दाखल केला आहे. वरील दोन्हीही नकाशे हे कच्चे असून परस्पर विरोधी असल्याने त्या नकाशांवर सद्यस्थितीत विश्वास ठेवता येणार नाही.

**१२.** निर्विवादीतपणे, या अर्जाच्या कामी सदर गाडी रस्ता अस्तीत्वात आहे हे दर्शविण्याची जबाबदारी वादीवर आहे. वादींनी त्यांच्या कथनापुष्ठर्थ साक्षीदार भिकाजी परिट यांचे निशाणी क्र. २२ वर शपथपत्र दाखल केले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या शपथपत्रामध्ये वरीलप्रमाणे गाडी रस्ता अस्तीत्वात असल्याचे व प्रस्तुत प्रतिवादींनी वादीस रस्त्यावरील वहिवाटीस हरकत अडथळा केल्याचे कथन केले आहे. वरील कथनांच्या अनुषंगाने वादी क्र. १ ने देखील त्याचे शपथपत्र (निशाणी क्र. ३६) अन्वये दाखल केले आहे. याउलट,

प्रतिवादी यांनी त्यांचेतर्फे मारुती थोरवत यांचे शपथपत्र निशाणी क्र. ३७ व विनोद जगदाळे यांचे शपथपत्र (निशाणी क्र. ३८) वर अभिलेखावर दाखल केले आहे व गट क्र. ७५८ मध्ये वरीलप्रमाणे कोणताही रस्ता अस्तीत्वात नव्हता असे कथन केले आहे.

**१३.** निश्चितपणे, वरील साक्षीदारांच्या परस्पर विरोधी शपथपत्रांआधारे अभिलेखाचे अवलोकन करता, वादी कथन करतात त्याप्रमाणे, सदर रस्ता अस्तीत्वात आहे या वादीच्या कथनास अनुसरुन सद्यस्थितीत वादीच्या तोंडी कथनांव्यतिरिक्त अन्य कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दाखल नाही. निश्चितपणे, वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान वरीलप्रमाणे गाडी रस्ता ठेवण्याचे ठरले होते असे वादीचे कथन असले तरी त्याचा उल्लेख उभयंतामध्ये झालेल्या नोंदणीकृत वाटणीपत्रामध्ये यायला हवा होता. तथापि, तसा उल्लेख वाटणीपत्रामध्ये आलेला दिसत नाही. वादीनी दावा रस्ता हा ५० वर्षांपासून त्यांच्या वहिवाटीचा रस्ता असल्याचे कथन केले आहे. मात्र, सदर रस्त्याचा गेली ५० वर्षांपासून वादी वापर करत आहेत यासंबंधी कोणताही प्रथम दर्शनी कागदोपत्री पुरावा वादींनी याक्षणी अभिलेखावर दाखल केलेला नाही. सबब, वरील सर्व कारणांचा विचार करता, वरील गाडी रस्त्याच्या अस्तीत्वाबाबत सद्यस्थितीत कोणताही प्रथम दर्शनी पुरावा नाही. त्यामुळे, वादीस प्रथमदर्शनी केस नाही, सोईचा समतोल वादीच्या बाजुने नाही. त्यामुळे, अर्ज नामंजूर केला तर वादीची कोणतीही हानी होईल असे वाटत नाही. करीता, मी प्रश्नबिंदू क्र. १ ते ३ ची उत्तरे नकारार्थी देत आहे.

**<u>प्रश्न बिंदू क्र. ४</u> –**

**१४.** प्रश्न बिंदू क्र. १ ते ३ ची उत्तरे नकारार्थी देण्यात आलेली आहेत. त्यामुळे, अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. अर्जाची वस्तुस्थिती लक्षात घेता खर्चासंबंधी कोणताही आदेश पारित करणे उचित राहणार नाही. सबब, प्रश्नबिंदू

क्र. ४ च्या उत्तराबद्दल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे–

**– आ दे श –**

**१.** अर्ज (निशाणी क्र. ०५) नामंजूर करण्यात येतो.

**२.** खर्चासंबंधी कोणताही आदेश नाही.

Amol Bharat Jawale
Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2023.09.15 17:39:40 +0900

कागल.
**(ए.बी. जवळे)**
दिनांकः– १३/०९/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.